शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक - मनपा/शिक्षण/प्राशा/ ३२५६
दिनांक - १६ सप्टेंबर, १९८८.

१२०

मुख्याध्यापक,
....सलाने अॅज्यु. सोसायटीची.......
....न्यू इंग्लिश स्कूल.......... पुणे २८.
२१६ सलाने आळी, छपवर

यांस -

विषय - शाळा मान्यतेबाबत.

संदर्भ - मा.शि.मं.ठ.क्र.१३९ दिनांक २९-८-८८.

मा. शिक्षण मंडळ ठराव क्र.१३९ दि.२९-८-८८ व मा. शिक्षण मंडळाने माहे ऑगस्ट,८८ चे पहिल्या आठवड्यात केलेल्या पाहणीवरून तुमचे शाळेस फक्त सन १९८८-८९ या शालेय वर्षाकरिता विनाअनुदान तत्वावर पाहणी अहवालातील खालील ✓ दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियमांची पूर्तता करण्याच्या अटीवर, इ.१ ते ७वी चे सवर्को मोफत तुकडीस मान्यता देण्यात येत आहे.

✓ (१) विनाअनुदान खाजगी प्राथमिक शाळांना वर्ग फी रु.१५/- (पंधरा) शासनाने नियमाप्रमाणे फी घेता येईल. तुमचे शाळेत वर्ग फी रु.१५/- पेक्षा जास्त फी घेण्यात येते.

✓ (२) शाळेत नेमण्यात आलेले शिक्षक प्राथमिक शाळांसाठी अप्रशिक्षित (बी.ए. बी.एड.) आहेत.

✓ (३) शाळेत नेमण्यात आलेले शिक्षक विहित वयोमर्यादेपेक्षा जादा वयाचे आहेत.

✓ (४) शाळेतील काही वर्गातील विद्यार्थी संख्या शहरी भागाचे मानाने कमी आहे.

✓ (५) शाळेची इमारत शाळेसाठी योग्य नाही.

✓ (६) भाषासमर्थीय शिक्षक नेमणे आवश्यक आहे.

✓ (७) शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे शिक्षकांना वेतन व भत्ते देण्यात येत नाहीत. ते शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे देण्यात यावेत.

✓ (८) शाळेस क्रीडांगण नाही.

वरील त्रुटींची पूर्तता दिलेल्या मुदतीत (३०-४-८९) न केल्यास पुढील वर्षी शाळेस मान्यता दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे, दिनांक - १६/९/८८.

[signature]

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.